# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/०६/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक २४/०६/२०२४ चे १०.०० वा. ते १०.४५ वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत अवैध रेती संबंधाने पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय खबर द्वारे माहिती मिळाली की, मौजा युनीयन बॅक शाखा समोर कन्हान रोडवर ट्रक द्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून घटनास्थळी नाकाबंदी केली असता दोन ट्रक विनापरवाना अवैध रेती वाहतुक करताना मिळुन आले त्यांना थांबविले असता समोरील ट्रक क्र. एम एच ४०/सी एम–६८४५ हा थांबला नाही व मागील ट्रक एम एच ४०/सी टी–०००९ हा थांबला व समोरील ट्रकचा पाठलाग करून त्याला थांबविले त्यास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता चालकाने दाखविलेली रेती बुऱ्हानपुर मध्यप्रदेश येथील असल्याचे दिसुन आल्याने महाराष्ट्रात आणने कामी झिरो रॉयल्टी लागते ती आपले जवळ आहे का असे विचारले असता त्याने त्याचे जवळ झिरो रॉयल्टी नसल्याचे सांगीतले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून १) ट्रक क्र. एम एच– ४०/सी एम– ६८४५ कि. २०,००,०००/–रू. मध्ये १० ब्रास रेती ३०,०००/–रू. २०,३०,०००/–रू. २) ट्रक एम एच–४०/सी टी–०००९ कि. २५,००,०००/–रू. मध्ये १२ ब्रास रेती कि. ३६,०००/–रू. एकुण २५,३६,०००/– रू. असा एकुण दोन्ही वाहनासह व रेती मिळुन ४५,६६,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी ट्रक चालक **१) विनोद अशोक टेकाम, वय २७ वर्ष, रा. न्यु गोंडेगाव २) रामदास हरी गोंडाने वय ४५ वर्ष, रा. वारेगाव खपरखेडा ३) गाडी मालक अमीत गजानन मोटे रा. स्नेह नगर, मौदा ह. मु. दिघोरी नागपुर** याचे विरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. कन्हान येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. ०१) व २) यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार उमेश पाटील, सपोनि रोशन बावनकर, सफौ सुर्यभान जळते, पोशि गणपत सायरे यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर